# एतदर्थ मंडळ ( मराठी प्रशिक्षण व परीक्षा ), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे ( पूर्व ), मुंबई ४०००५१

## राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा

## प्रश्नपत्रिका एक - विहित पाठयपुस्तक व कार्यरूप व्याकरण

रविवार, दिनांक ९ जानेवारी, २०२२

[ वेळ : सकाळी १०.३० ते दुपारी १.०० ]

**( तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून )**

**(एकूण गुण : १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

प्रश्न क्र.१ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. **२०**

मैत्रीचा मंत्र सांगणा-या या ऑलिंपिक सामन्यांची त्यानंतर इ. स. १८९४ साली आधुनिक जगाला आठवण झाली. त्यावर्षी फ्रान्स देशात एक 'ऑलिंपिक कॉग्रेस भरवण्यात आली होती. त्या कॉग्रेसला अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. कुबर टीन नावाच्या फ्रेंच क्रीडातज्ज्ञाने या कॉग्रेसमध्ये ऑलिंपिक सामन्यांचे पुनरुज्जीवन केले. शरीरसंपदा वाढवण्यासाठी, बलसंवर्धन करण्यासाठी आणि प्रामुख्याने देशादेशांतील मैत्री वाढून त्यांच्यात मित्रत्वाची स्पर्धा व्हावी यासाठी प्राचीन ऑलिंपिक सामन्यांप्रमाणेच यापुढे आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा भरवाव्यात असे ठरले. १८९६ पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवले जातात. त्या निमिताने जगात सद्भावना, समता, मैत्री, विश्वबंधुत्व, शिस्त व ऐक्य या भावना वाढीस लागतात.

या सामन्यांत निरनिराळ्या एकवीस खेळांची तरतूद आहे. पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात. या सामन्यांच्या व्यवस्थेसाठी एक आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती नेमलेली असते. या स्पर्धांत भाग घेणा-या प्रत्येक देशाचे एक ते तीन प्रतिनिधी या समितीत असतात. या समितीमध्ये खेळांची व्यवस्था त्या त्या खेळांच्या आंतरराष्ट्रीय संघाकडे असते. ऑलिंपिक सामन्यांसाठी लागणारा खर्च फारच मोठा असतो. हा सर्व पैसा स्पर्धक देश उभा करतात.

क्रीडेच्या क्षेत्रात जातिभेद नाही, धर्मभेद नाही की वर्णभेद नाही. येथे सर्वांना समान संधी मिळते. अमेरिकेतील जेसी ओवेन्स हा वंशाने आफ्रिकी खेळाडू. १९३६ मध्ये बर्लिनला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत त्याने चार अजिंक्य पदे मिळवली. इतकेच नव्हे, तर त्या चारही बाबतीत त्याने नवे उच्चांक प्रस्थापित केले. अमेरिकेच्या यशाचा तो मोठा शिल्पकार ठरला. अमेरिकनच नव्हे, तर सा-या जगाने या खेळाडूचा त्यावेळी केवढा गौरव केला ! केवढे कौतुक केले ! ओवेन्सचा वर्ण, त्याचा देश हे सर्व विसरून सा-या जगाने त्याची प्रशंसा केली.

एमिल झेटोपेक हा झेकोस्लोव्हाकियाचा खेळाडू. १९५२ साली त्याने हेलसिंकीचे मैदान गाजवले. तेथे त्याने ५,००० मीटर धावणे व मॅरेथॉन या लांब पल्ल्याच्या शर्यतीत नवीन विक्रम केले व नवा इतिहास घडवला. जगातील एक 'मानवी रेल्वे इंजिन' अशी झेटोपेकने ख्याती मिळवली. यामुळे जगातील सर्व लोकांना झेटोपेक बद्दल तर अभिमान वाटलाच; पण त्याबरोबर झेकोस्लोव्हाकिया देशाबद्दलही त्यांच्या मनात आदर निर्माण झाला.

[ उलटून पहा. ]

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : -

(अ) आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा भरवाव्यात असे का ठरले.

(ब) ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवल्याने काय होते?

(क) ऑलिंपिक समिती कशी तयार होते?

(ड) क्रीडेच्या क्षेत्रात सर्वांना समान संधी मिळते असे का म्हटले आहे?

(इ) 'मानवी रेल्वे इंजिन' अशी झेटोपेकने ख्याती कशी मिळवली.

प्रश्न क्र.२ गट "अ" मधील वाक्प्रचारांची गट "ब" मधील अर्थाशी समान जुळणी करा. १०

| "अ" गट | "ब" गट |
|---|---|
| (अ) हातावर तुरी देणे | (१) दुर्लक्ष करणे |
| (ब) भान नसणे | (२) अडथळा येणे |
| (क) काना डोळा करणे | (३) दोष देणे |
| (ड) खडे फोडणे | (४) खूप कष्ट करणे |
| (इ) घाम गाळणे | (५) जाणीव नसणे |
| (फ) धन्य होणे | (६) अतिरेक करणे |
| (ग) कहर करणे | (७) विश्रांती घेणे |
| (ह) कारवाया करणे | (८) डोळ्यांदेखत फसवून निसटून जाणे |
| (य) विसावा घेणे | (९) कारस्थाने करणे |
| (र) माशी शिंकणे | (१०) कृतार्थ होणे |

प्रश्न क्र.३ पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांचा वाक्यात उपयोग करा. १०

(अ) मंदीर
(ब) बाग
(क) इच्छा
(ड) जीवन
(इ) कर्तृत्व
(फ) शिक्षण

प्रश्न क्र.४ पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे लिहा. २०

(१) गाणे गाताना सूर महत्वाचे असतात, असे व. पु. काळे यांनी का म्हटले आहे?

(२) 'काझीरंगा' या स्थूलवाचनाच्या आधारे 'प्राण्यांचे गंधज्ञान' ही संकल्पना स्पष्ट करा.

(३) सखू आजीचे व्यक्तिचित्र रेखाटा.

(४) व्यंगचित्र व हास्यचित्र यांमधील फरक लिहा.

(५) 'कुलूप' या पाठाच्या आधारे व्यक्तिमत्त्व विकासात छंदाचे महत्त्व लिहा.

(६) वृक्ष व मानवी जीवन यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

[ उलटून पहा. ]

प्रश्न क्र.५ कोणत्याही एका पाठाच्या / कवितेच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही चार) १०

(अ) 'आभाळातल्या पाऊलवाटा' या पाठाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) पक्षांच्या बाबतीत सर्वात स्तिमित करणारी गोष्ट कोणती?

(२) पक्ष्यांच्या स्थलांतराची वैशिष्ट्ये लिहा.

(३) स्थलांतर करणा-या वेगवेगळ्या जातींतील पक्ष्यांचे साम्यघटक लिहा.

(४) केरळात वाळे लावलेले परीट पक्षी कोणत्या भागांत सापडले आहेत?

(५) माणूस एका खंडातून दुस-या खंडात प्रवास करू लागला तेव्हा त्याच्या काय लक्षात आले?

किंवा

(ब) 'तिफन' या कवितेच्या आधारे पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.

(१) 'तिफन' या कवितेची मध्यवर्ती कल्पना स्पष्ट करा.

(२) 'तिफन' या कवितेतून कोणता संदेश मिळतो?

(३) 'तिफन' या कवितेची भाषिक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(४) 'काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते', काव्यपंक्तीतील संकल्पना स्पष्ट करा.

(५) काया मातीत मातीत तिफन चालते, ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते, या काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.

प्रश्न क्र.६ (अ) पुढीलपैकी कोणत्याही पाच इंग्रजी शब्दांचे मराठीतील पर्यायी शब्द लिहा. ५

(१) Unity
(२) Discrimination
(३) Personality
(४) Miracle
(५) Hesitation
(६) Departure

(ब) पुढीलपैकी कोणत्याही पाच संख्या अक्षरात लिहा. ५

(१) ७२८२

(२) ९०० + ६० = ९६०

(३) ३४० - १५ = ३२५

(४) १५ × ३ = ४५

(५) ४८० ÷ १२ = ४०

(६) ३६.७

(क) रिकाम्या जागी कंसातील शब्दांचे योग्य रूप घालून ती वाक्ये पुन्हा लिहा. १०

(१) मुहूर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन ........सुखरूप परत आली. ( मुंबई )

(२) राज्य सरकारचे प्रतीक म्हणून आसामात ठिकठिकाणी त्याचे ....... उभारलेले आढळतात. ( पुतळा )

(३) ऑलिंपिक ........म्हणजे क्रीडापटूंसाठी आणि क्रीडा शौकिनांसाठी एक पर्वणीच असते. ( सामना )

(४) एक मोठ्या समारंभात ........अध्यक्षांनी एडिसनचा सन्मान केला. (अमेरिका )

(५) गाव म्हणजे ......... गोतावळा. ( म्हातारी )

(६) ............ पर्वतरांगांमध्ये राहणारे पक्षी थंडीत खाली दरीत अथवा सखल भागात उतरतात. ( हिमालय )

[ उलटून पहा. ]

## एतदर्थ मंडळ ( मराठी प्रशिक्षण व परीक्षा ), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे ( पूर्व ), मुंबई ४०००५१

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा**

**प्रश्नपत्रिका दोन - सुसंगत लेखन व अनुवाद**

रविवार, दिनांक ९ जानेवारी, २०२२

[ वेळ : दुपारी २.१५ ते ५.०० ]

**( तोंडी परीक्षेस लागणारा वेळ धरून )**

**(एकूण गुण : १००)**

---

**सूचना :-** (१) नवीन प्रश्न नवीन पानावर सोडवावा.

(२) प्रत्येक प्रश्नाचे **गुण** त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

(३) प्रश्नासमोर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे अन्यथा पूर्ण गुण दिले जाणार नाहीत.

**गुण**

**१. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे १५ ते २० ओळींत तुमचे विचार मांडा.** २०

(अ) रम्य ते बालपण

(ब) कोरोना- एक जागतिक संकट

**२. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर चर्चा करा.** २०

(अ) जगणं कठीण होत आहे! या विषयावर चर्चा करा.

(ब) मुलींचे लग्नाचे वय काय असावे ? यांविषयी चर्चा करा.

**३. पुढीलपैकी कोणत्याही दोन बाबी तयार करा.** ३०

(अ) दिव्यांगासहित इतर अधिकारी/कर्मचारी यांची गट अ व गट ब मधील पदांवर पदोन्नतीमधील आरक्षणाबाबतीची माहिती देणेबाबत परिपत्रक तयार करा.

(ब) पुणे मनपा क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालये ऑफलाईन पद्धतीने सुरू करण्याबाबतचे प्रसिध्दिपत्रक तयार करा.

(क) जिल्हा सामान्य रूग्णालय, धुळे ह्या रुग्णालयातील वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या अधिपत्याखालील नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास तत्वत: मान्यता देण्याबाबत प्रस्ताव तयार करा.

**४. पुढीलपैकी प्रत्येक गटातून कोणत्याही पाच संज्ञांचे मराठी पर्याय द्या.** १५

**"अ" गट**

(अ) Championship — (ब) Layout

(क) Commissioner — (ड)Administration

(इ) Barometer — (फ) Validity

[ उलटून पहा. ]

गुण

"ब" गट

(अ) Journal

(ब) Noteway

(क) World Record

(ड) Pedestrian

(इ) Procession

(फ) Recommendation

"क" गट

(अ) Non-bailable

(ब) Verification

(क) Senate

(ड) Organisation

(इ) Foundation

(फ) Barcode

५. खालीलपैकी कोणत्याही पाच वाक्यांचे मराठीत भाषांतर करा. १५

(अ) The bus was so crowded that I was kept standing all the way to the station.

(ब) Since the Industrial Revolution, the world population has more than tripled.

(क) The human race has one really effective weapon and that is laughter.

(ड) In the first place, we must be careful about what we eat and drink.

(इ) The leaves of the trees in the garden have turned completely red.

(फ) This book has been translated into more than fifty languages.

------------------------